# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा संपन्न

महाड

शैक्षणिक गुणवत्तेबरोबर शारिरीक व मैदानी गुणवत्ताही महाविद्यालयीन जीवनात महत्त्वाची आहे असे प्रतिपादन कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार श्री. बाळाराम पाटील यांनी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या पदवी प्रदान सोहळयात प्रमुख अतिथी म्हणून बोलत असताना केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा मला माझ्या आजोबा व वडिलांकडून मिळाला व त्याचा सार्थ अभिमान आहे तसेच बाबासाहेबाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व त्यांच्याच नावाने स्थापन झालेल्या महाविद्यालयात येण्याचे भाग्य लाभले ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे असेही मनोगत त्यांनी व्यक्त केले.

सामाजिक व राजकीय चळवळीतून रायगड जिल्हयाचा विकास झाला. हा विकास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतून झाला याची इतिहासाने नोंद घेतली आहे. रायगड जिल्हयातील कृती चळवळ व या चळवळीला लाभलेले डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व यामुळे रायगड जिल्हयातील कष्टकरी, कामगार व शेतकरी वर्गामध्ये आत्मभान निर्माण झाले, अशाच प्रकारचे समाजभान निर्मितीचे काम या स्मारक महाविद्यालयात केले जात आहे. येथे विद्यार्थी रूपी हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम अविरत चालू आहे असे गौदवोद्गारही त्यांनी या प्रसंगी काढले

या पदवी प्रदान कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थान भूषविणारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांनीही विद्यार्थ्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे पवित्र काम करून त्यांची सालंकृत रवानगी करण्याची नैतिक जबाबदारी अहर्निशपणे महाविद्यालयाकडून पार पाडली जात आहे याचा मला सार्थ अभिमान आहे, मात्र हे दान व्यवस्थितपणे आत्मसात करून विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधावा व त्यासाठी वैविध्यपूर्ण वाचन सातत्य ठेवावे असेही त्यांनी सांगितले. आजच्या युगात माहितीचे संकलन मोठया प्रमाणात असले तरी याचे ज्ञानात रूपांतरण करणे अत्यंत महत्वाचे आहे हे त्यांनी स्पष्ट केले यासाठी समाजाकडे चौकस दृष्टीने पाहून इथल्या समस्या सोडविण्यासाठी उत्तम दर्जाच्या कृषी विज्ञान विद्यापीठाची निर्मिती करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कला, वाणिज्य विज्ञान विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या तसेच एनसीसी, एनएसएस क्रीडा, सांस्कृतिक विभागातील विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्याचा गौरव आमदार श्री. बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितिन थोरात, आभार प्रदर्शन प्रा. ए.डी. पुकळे व प्रास्ताविक प्रा. दिक्षा कांबळे यांनी केले.